# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

क्र. १४७७(२)/२०१९/१४-अ

## राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१९

(जाहिरात क्रमांक ०७/२०१९)

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १३ ते १५ जुलै, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१९** च्या एकूण ४२० पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अटीच्या अधिन राहून दिनांक १९ जून, २०२० रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये सातारा या जिल्ह्यातील श्री. चौगुले प्रसाद बसवेश्वर बैठक क्रमांक PN००८३५६ हे राज्यातून सर्वसाधारण वर्गवारीमधून प्रथम आले आहेत व उस्मानाबाद या जिल्ह्यातील श्री. शेळके रविंद्र आपदेव बैठक क्रमांक AU००२१६७ हे मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून अमरावती या जिल्ह्यातील श्रीमती पाटील पर्वणी रविंद्र बैठक क्रमांक PN००७३५६ ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण **(cut off marks)** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१९ दि. १७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मुंबईसह अन्य ३७ जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता ३,६०,९९० उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून राज्य सेवा (मुख्य) परीक्षेकरिता ६, ८२५ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि.१३ ते १५ जुलै, २०१९ रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे घेण्यात आली होती. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी १,३२६ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या व इतर अन्य मुद्यांच्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ पहावी.)

दिनांक : १९ जून, २०२०.
ठिकाण : मुंबई

उप सचिव (परीक्षा -१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.